# प्रकरण पहिले

# बार्शी शहराचे भौगोलिक स्थान व रचनेचा अभ्यास

# प्रकरण पहिले
# बार्शी शहराचे भौगोलिक स्थान व रचनेचा अभ्यास

अवर्षणप्रवण सोलापूर जिल्हा

सोलापूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ आणि विस्तार

बार्शी तालुक्याचे हवामान

बार्शी : पावसाचे प्रमाण ( पर्जन्यमान )

बार्शी तालुका : जमिनीचा प्रकार व घेतली जाणारी पिके

बार्शी तालुका : लोकसंख्या

बार्शी तालुका : लोकजीवन

बार्शी शहराची रचना

बार्शी शहराची वॉर्डरचना

नगरपालिकेची हद्द

टेबल क्र. - १

नकाशा क्र. - १

नकाशा क्र. - २

# प्रकरण पहिले
# बार्शी शहराचे भौगोलिक स्थान व रचनेचा अभ्यास

## अवर्षणप्रवण सोलापूर जिल्हा :

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यामधील बार्शी तालुका हा अपर्षणप्रवण (दुष्काळी) तालुका म्हणून ओळखला जातो. बार्शी तालुक्यातील हवामान , जमीन , पर्जन्यमान , सतत पडणारा दुष्काळ , तसेच सामाजिक व राजकीय वैशिष्ट्यामुळे हा तालुका मागास राहिलेला आहे.

## अवर्षणप्रवण जिल्हा :

" पारदासानी " समितीने १९५७ पर्यंतच्या ३० वर्षाच्या कालावधीतील पर्जन्यमान, जाहिर झालेला दुष्काळ , टंचाई परिस्थिती यांचा अभ्यास करुन माळशिरस तालुक्याचा काही भाग वगळता इतर तालुके अवर्षणप्रवण असल्याचे जाहिर केले आहे. १९६० मध्ये केंद्रिय जलसिंचन आयोगानेही माळशिरस तालुका वगळता सर्व तालुके अवर्षणप्रवण जाहिर केले. 'सुकथनकर समितीने' १९७३ मध्ये जिल्ह्यातील लहरी व तुटपुंज्या पर्जन्यमानाचा सखोल अभ्यास करुन माळशिरस व पंढरपूरचा बागायत भाग वगळता संपूर्ण जिल्हा अवर्षणप्रवणक्षेत्र म्हणून जाहिर केला. १९८७ मध्ये सुब्रह्ममण्यम् समितीने (अवर्षणप्रवणक्षेत्र पुर्निविलोकन समितीने) जिल्ह्यातील सर्व ११ तालुके अवर्षणप्रवणक्षेत्र म्हणून जाहिर केले.[१]

सोलापूर जिल्ह्यातील जमीन मुख्यत: ज्वालामुखीच्या उद्रेकातून निर्माण झालेली आहे. तिचा खालचा थर हा अग्निजन्य खडकाचा मुरुम या प्रकारात मोडतो. जिल्ह्यातील भीमा नदी ही प्रमुख नदी असून तिच्या उजवीकडील भागात निरा, माण आणि डाव्या भागात सीना , भोगावती या उपनद्या आहेत. भीमा नदीकाठावरील सुपिक व काळसर

मातीचा प्रदेश सोडला तर जिल्हयातील बहुतांश जमीन हलक्या प्रतीची आहे. जिल्ह्यातील जमीनीवर वनक्षेत्राचे प्रमाण एकूण जमिनीच्या केवळ २.५ टक्के आहे. भीमा नदीवरील उजनी प्रकल्प हा जिल्ह्यातील सर्वात मोठा सिंचन प्रकल्प असून पुणे जिल्ह्यातील वीर धरणाच्या भाटघर धरणाच्या नीरा उजव्या कालव्यामुळे जिल्ह्यातील माळशिरस, पंढरपूर, सांगोला या भागातील शेतीला कृत्रिम पाणीपुरवठ्याव्दारे बागायत केले आहे. ग्रामीण भागात एकूण लोकसंख्येच्या ७९ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. शेती हेच त्यांचे मुख्य उपजीविकेचे साधन आहे.

**बार्शी शहराचे भौगोलिक स्थान :**

**सोलापूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ आणि विस्तार :**

सोलापूर जिल्ह्याचे १७ डिग्री ते १९ डिग्री (Degrees) आणि ७५ डिग्री ते ७७ Longitudes पसरलेला आहे. सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिण सीमेवर वसलेला आहे. सोलापूर जिल्हयाच्या लगत खालील जिल्ह्यांच्या व राज्यांच्या सीमा आहेत. पश्चिमेस सातारा , पुणे व सांगली जिल्ह्या व कर्नाटक राज्याचा काही भाग पूर्वेस उस्मानाबाद जिल्ह्या , दक्षिणेस कर्नाटक राज्य तर उत्तरेस अहमदनगर आणि उस्मानाबाद जिल्ह्याचा काही भाग सोलापूर जिल्ह्याचे मुख्य ठिकाण हे सोलापूर शहर आहे. सोलापूर शहर महाराष्ट्राची राजधानी मुंबईपासुन २८३ मैल एवढ्या अंतरावर आहे. सोलापूर शहर मुंबई-मद्रास रेल्वे मार्गावर वसलेले आहे. सोलापूर जिल्ह्या समुद्रसपाटीपासून १८०० फूट एवढ्या उंचीवर असलेल्या एका विस्तीर्ण पठारात सामावलेला आहे. सोलापूर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ५,८१२.६ घनमैल एवढे आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण ११ तालुक आहेत. ते पुढीलप्रमाणे १)उत्तर सोलापूर २)दक्षिण सोलापूर ३) मोहोळ ४) माढा ५) पंढरपूर ६) माळशिरस ७) करमाळा ८)बार्शी ९) सांगोला १०) मंगळवेढा ११) अक्कलकोट. जिल्ह्यामधून भिमा , सीना , भोगावती,

नीरा , माण या प्रमुख नद्या वाहतात. तर होटगी तलाव , हिप्परगा तलाव, सिध्देश्वर तलाव, कंबर तलाव , भांबूर्डी तळे , मांगी तळे , आष्टी तळे , पाथरीचे तळे इ. लहानमोठी तळी आहेत.

## बार्शी हवामान :

सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यापैकी बार्शी तालुका हा क्षेत्रफळाच्या बाबतीत सर्वात मोठा ६२७.८ घनमैल आहे. त्याचप्रमाणे सर्वात महत्त्वाचा देखील आहे. बार्शी तालुक्याचा वायव्य भाग हा डोंगराळ आहे. बाकी उरलेला भाग सपाट आहे. सोलापूर जिल्ह्याचे विशेषता बार्शी तालुक्याचे हवामान सर्वसाधारणपणे विषम आहे. मार्च ते जुन या महिन्यामध्ये तापमान अतिशय उष्ण असते. तर नोव्हेंबर ते फेब्रुवारी दरम्यान शिशिर आणि वसंत ऋतुमध्ये हवामान अतिशय अल्हाददायक असते. या दिवसात वारे पूर्वेकडून पश्चिमेकडे वहात असते. तालुक्याचे कमाल तापमान १११ डिग्री फॅरनहाइट तर किमान तापमान ७२ डिग्री फॅरनहाईट असते.[२]

## बार्शी पावसाचे प्रमाण ( पर्जन्यमान ) :

सोलापूर जिल्हयाचे विशेषता बार्शी तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान २५ इंच एवढे आहे. तरीसुध्दा ते अनिश्चित स्वरुपाचे आहे. बालाघाट डोंगररांगाच्या जवळ असल्यामुळे बार्शी तालुक्यात सरासरी वार्षिक पर्जन्यमान २९ इंच असते.[३] बार्शी तालुक्याच्या पूर्वेला आणि उत्तरेला बालाघाटच्या टेकड्या आहेत. साधारणपणे सीना नदीने सोलापूर जिल्ह्याचा जवळजवळ १/३ पूर्व भाग पूर्णपणे व्यापलेला आहे. या पूर्व भागामध्ये करमाळा , पश्चिम बार्शी , पूर्व माढा , मोहोळचा मध्यभाग व दक्षिण सोलापूर तालुक्याचा उत्तरभाग येतो. सीना नदी ही बार्शीच्या दृष्टिने सर्वात मोठी नदी आहे.[४]

‘ बार्शीमध्ये इ. स. १८९५ मध्ये सप्टेंबर महिन्यात २४ तास पाऊस पडला. वार्षिक पर्जन्यमान १५३. ५ मि.मि. होते. इ. स. १९०५ मध्ये वार्षिक ४३ मि.मि. एवढा पाऊस पडला. तर १९१६ मध्ये सर्वात जास्त पाऊस सर्वात जास्त पाऊस १७८ मि.मि. एवढा पडला.’[५]

‘ बार्शी तालुक्यामध्ये पडणाऱ्या पर्जन्याचा विचार केला तर असे दिसून येते की, जून , जुलै, व ऑगस्ट या तीन महिन्यामध्येच पावसाचे प्रमाण बरे असते.’[६]

‘ भौगोलिक दृष्टिकोनातून जर बार्शी तालुक्याचा विचार केला तर असे दिसून येते की, हा डोंगराळ भाग आहे. सीना नदी सोडली तर या भागातून कोणतीही नदी वहात नाही. त्यामुळे बार्शी भागातील लोकांचे जीवन हे पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. आणि पडणारा पाऊसही अनियमित असतो.’[७] ‘बार्शी भागामध्ये जून , जुलै, ऑगस्ट , सप्टेंबर या चार महिन्यात पाऊस पडतो. पावसाचे प्रमाण बेताचेच असल्यामुळे बार्शी तालुका नेहमी दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. कोणतेही मोठे धरण या भागामध्ये नाही. जी शेती केली जाते ती अनियमित पडणाऱ्या पावसावरच पूर्णपणे अवलंबून आहे.[८]

## बार्शी जमीनीचा प्रकार व घेतली जाणारी पिके :

बार्शी तालुक्यामध्ये एकूण १२९ गावे आहेत. सर्वच खेड्यांमध्ये शेती हाच प्रमुख धंदा आहे. बार्शी शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांमध्ये देखील नोकरदारांचे प्रमाण सोडले तर शेतीपूरक व शेतीव्यतिरिक्त इतर लघू उद्योग करणाऱ्या नागरिकांचेच प्रमाण अधिक आहे. जमिनीच्या प्रतवारीचा जर विचार केला तर कमी प्रतवारीची जमीन जास्त आहे. काळी , भुरी , बरड व तांबड्या रंगाच्या जमिनी आहेत. नदीकाठी काळी जमीन अढळते. बागायती व जिरायती अशा दोन प्रकारची शेती या भागामध्ये केली जाते. जिरायती शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. तर बागायती शेती ही विहीरीच्या व लहान लहान शेततळ्यांच्या पाण्यावर अवलंबून आहे.

हंगामाचा विचार केला तर दोन हंगामामध्ये शेती केली जाते.

१. **खरीप हंगाम :**

खरीप हंगामाची सुरुवात जुनच्या पहिल्या आठवड्यापासुन होते. तर शेवट हा नोव्हेंबर डिसेंबर महिन्यामध्ये होतो. जुनच्या पहिल्या आठवड्यात मान्सूनला सुरुवात होते. मान्सूनच्या सुरुवातीला शेतकरी पेरण्या सुरु करतो. या हंगामामध्ये कापूस , भुईमुग , बाजरी , तूर , मका, मुग, उडीद इत्यादी पिके घेतली जातात. साधारणपणे नोव्हेंबर डिसेंबरमध्ये पिकांची काढणी सुरु होते.

२. **रब्बी हंगाम :**

या हंगामाची सुरुवात ऑक्टोंबरच्या मध्यापासुन होते. पावसाळ्यामध्येच जमीन मशागत करुन पेरणीसाठी तयार केलेली असते. ऑक्टोंबरमध्ये रब्बी पेरणीला सुरुवात होते. ज्वारी हे सोलापूर जिल्हयातील विशेषता बार्शी तालुक्यातील प्रमुख रब्बी पिक आहे. ऑक्टोंबरमध्ये या पिकाची पेरणी करुन जानेवारी फेब्रुवारीमध्ये काढणी व मळणी केली जाते. रब्बी हंगामामध्ये ज्वारी , गहू, हरभरा , करडई , इत्यादी पिके घेतली जातात. या पिकांना पाऊस बेताचाच लागतो.

'बार्शी' हे शहर महाराष्ट्रात व्यापारी बाजारपेठ म्हणून ओळखले जाते. बार्शीचे क्षेत्रफळ हे १,६५,३७७ चौरस हेक्टर असून यापैकी लागवडीखालील जमीन १,१३,०८७ चौरस हेक्टर आहे. त्यापैकी ओलिताखाली (बागायत) असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ फक्त ९,२४६ हेक्टर आहे. म्हणजेच लागवडीखालील जमिनीमध्ये कमी प्रतीच्या व जिरायती क्षेत्राचाच भरणा जास्त आहे. बार्शी तालुक्यामध्ये प्रामुख्याने ज्वारी , तूर , भूईमुग, मका , हळद, ही पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. बार्शीची शाळू (ज्वारी) ही अख्या महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. शाळूचे पिकसुध्दा पावसाच्या व विहीरीच्या पाण्यावरच अवलंबून असते.'[९]


## लोकसंख्या :

सोलापूर जिल्ह्याची लोकसंख्या ही महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या ५ टक्के एवढी आहे. तर पूणे विभागाच्या एकूण लोकसख्यच्या २० टक्के एवढी आहे. तर बार्शीची लोकसंख्या (तालुक्याची) ही सोलापूर जिल्हयाच्या १५ टक्के आहे. यामध्ये शहरी लोकसंख्येपेक्षा ग्रामीण भागामध्ये राहणारी लोकसंख्या अधिक आहे.


१९९१ च्या जनगणनेनुसार बार्शी तालुक्याची लोकसंख्या २,५८,८०० एवढी आहे. पैकी १,३३,३०० पुरुष तर १,२५,५०० स्त्रीया आहेत. लोकसंख्या साक्षरतेचे एकूण प्रमाण एकुण लोकसंख्येच्या ४०. ६९ टक्के आहे. त्यापैकी ५३.५६ टक्के पुरुष व २६.९३ टक्के स्त्रिया साक्षर आहेत. वयानुसार लोकसंख्या पाहिली. तर मध्यम वयोगट ( ३५ ते ४४ वर्षे) संख्या सर्वात जास्त व ६० वर्षावरील व्यक्तीची लोकसंख्या सर्वात कमी असल्याचे अढळून येते. धर्माचा विचार करता ग्रामीण भागात हिंदू धर्मियांची लोकसंख्या मुस्लिम व बौध्द धर्मीयांपेक्षा अधिक आहे.

## लोकजीवन :

भीमा नदी सोडली तर जिल्ह्यातुन दुसरी कोणतीही मोठी नदी वहात नाही. त्यामुळे लोकांना बारमाही पाणी मिळत नाही. त्यांना पावसाच्या पाण्यावरच अवलंबून रहावे लागते. बार्शी तालुका तर कायमपणे दुष्काळी म्हणूनच ओळखला जातो. शेती हाच येथील प्रमुख व्यवसाय आहे. ९० टक्के शेती ही पावसाच्या पाण्यावर असलंबून आहे. त्यामुळे येथील शेतकरी हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. येथील शेतकऱ्याचे जीवन हे अतिशय कष्टप्रद असते. वारंवार दुष्काळासारख्या संकटांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. बार्शी हे शहर असल्यामुळे येथील परिस्थिती थोडी वेगळी आहे. शहरामध्ये लोकांचे राहणीमान काही प्रमाणात सुधारलेले दिसते. त्यांची आर्थिक परिस्थितीही बरी आहे. एकंदरित भौगोलिक वातावरण हे लोकजीवनाला फारसे अनुकूल आहे असे दिसत नाही.




बार्शी शहर विकास आराखडा




बार्शी नगरपरिषद वॉर्ड दर्शविणारा नकाशा

## बार्शी शहराची रचना :

सरकारने मे. टाऊन प्लॅनर , टाऊन प्लॅनिंग अँड व्हॅल्युएशन डिपार्टमेंट , पूणे यांनी आपल्या रिपोर्टमध्ये जो समारोपाचा परिच्छेद लिहीला आहे तोच येथे देण्यात येत आहे. यावरुन डेव्हलपमेंट प्लॅनचे उद्दिष्ठ व तो कार्यान्वित करण्याची आवश्यकता व महत्व दिसून येते.

" This development plan in an attempt to come our of the tangle of accumulated unplanned growth and to good for the defencies as far as possible . It places before the public and the authorities concerned a well thought out framework aiming at creating an integrated community and transforming the present insanitary and congested town into a beautiful and healthy place to live in . The collective responsibilities rest upon citizens of the present generation for making their city's future in countless ways. The ultimate success would therefore depends upon the efficiency , vigilence and speed with which the proposals are executed by the local Authority and upon the healthy co-operation from the public, which itself would come forth . This development plan is an attempt to exert a well considered control on behalf of the people of the town over the development of their physical environment as whole"[10]

## बार्शी शहराची वॉर्डरचना :

सध्या बार्शी शहरामध्ये एकूण ४० वॉर्ड (प्रभाग) आहेत. नगरपालिकेचे (शहराचे) क्षेत्रफळ एकूण ३६.४० चौरस किलोमीटर एवढे आहे. प्रत्येक प्रभागाची विभागणी व क्षेत्रफळ खालीलप्रमाणे सांगता येईल.[११]

## बार्शी शहराचे वॉर्डनिहाय क्षेत्रफळ दर्शविणारा तक्ता

| अ.न. | वॉर्ड क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १. | वॉर्ड - १ | ६-९१-२० |
| २. | वॉर्ड - २ | २-६४-९६ |
| ३. | वॉर्ड -३ | २५३ - ४७- ३ |
| ४. | वॉर्ड -४ | ३-६-४३ |
| ५. | वॉर्ड -५ | २६० - ४५- ६० |
| ६. | वॉर्ड -६ | ३८८-४७- १६ |
| ७. | वॉर्ड -७ | ४-५६ - १९ |
| ८. | वॉर्ड-८ | ३ -७० -९४ |
| ९. | वॉर्ड-९ | ३ -८४-७६ |
| १०. | वॉर्ड-१० | ५ -५९-८० |
| ११. | वॉर्ड-११ | २२८ - ५९- १८ |
| १२. | वॉर्ड-१२ | २४७ - ७६ - ९३ |
| १३. | वॉर्ड -१३ | ७ - ४४ - १४ |
| १४. | वॉर्ड -१४ | ३ - ८४ - ७६ |
| १५. | वॉर्ड -१५ | २-११-९६ |
| १६. | वॉर्ड-१६ | ४-२३-६३ |
| १७. | वॉर्ड-१७ | ३-८७-७ |
| १८. | वॉर्ड-१८ | ४-४४-६७ |
| १९. | वॉर्ड-१९ | १०-११-४५ |
| २०. | वॉर्ड-२० | ५-२३-०० |
| २१. | वॉर्ड-२१ | २-५-५ |

| अ.न. | वॉर्ड क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| २२. | वॉर्ड-२ | २-७७-८५ |
| २३. | वॉर्ड-२३ | ६-८४-५९ |
| २४. | वॉर्ड-२४ | ३-४५-३४ |
| २५. | वॉर्ड-२५ | २३७-३५-६७ |
| २६. | वॉर्ड-२६ | ४२-६५-४० |
| २७. | वॉर्ड- २७ | १३२ - ०० - २८ |
| २८. | वॉर्ड - २८ | ३०-८५-५ |
| २९. | वॉर्ड - २९ | ६७ - ८४ -४४ |
| ३०. | वॉर्ड - ३० | २८ - ४०- ८३ |
| ३१. | वॉर्ड - ३१ | ३७६ - ६७ - ४० |
| ३२. | वॉर्ड - ३२ | १४७ -७२- ६ |
| ३३. | वॉर्ड - ३३ | १४९ - २२ - ६१ |
| ३४. | वॉर्ड - ३४ | ५२८ - ५२- ५४ |
| ३५. | वॉर्ड - ३५ | १०-२-२४ |
| ३६. | वॉर्ड - ३६ | ३ - ५०-२० |
| ३७. | वॉर्ड - ३७ | २ - ५५ - ७४ |
| ३८. | वॉर्ड - ३८ | ३ - ३४- ८ |
| ३९. | वॉर्ड - ३९ | ३ - ११- ४ |
| ४०. | वॉर्ड - ४० | २ - ९ - ६६ |
| | | हे . आर . चौ. मि. |

एकूण क्षेत्रफळ (३६२६ - ८५.००)

**नगरपालिकेची हद्द :**

सन १९८४ च्या अहवालानुसार नगरपालिकेची हद्द १४ चौरस मैलाची असल्याचे नमूद आहे. प्रचलित बार्शी नगरपालिकेची हद्द खालीलप्रमाणे -

**उत्तर** : स.नं. ४२९ , ४९६ ते ४९८ , ५०८ , ५०७ , ५१० , ५११ , ५३६, ५४५ , ५४४ , ५४३ , ५४२, ५७२, ५७१, ५९० , ५९१, ५८७,

**पूर्व** : स.नं. ५९३ , ६१३ , ६१० , ६३३ , ६३२ , ६२५, ६२८ , ११ ते १३, ३८ , ३३ , ३४ आणि १०१

**दक्षिण** : स.नं. १०० , ९८ चा भाग , ९० ते ९३ , ७६ , ७७, ७६ ७४ ,६४६ , ७३, ७२, १८२ , १८१, सर्व्हे नं १८० च्या दक्षिण सीमेपर्यंत पानगांव रस्त्याचे बाजूने , १७९ , १७६ , १७५ , १७४ , १७० , १६९ , २०७ , २०६ , २२४ , २२५ , २९३, २९३, २९२, २५५ , २५६ चे नाल्यापलिकडील हद्द

**पश्चिम** : स.नं. २५७ , २६२ , २६३ , २६७ ,२६६ . स.नं . २६ ची पश्चिम सीमा कुईवाडी रस्त्यालगत , ३६२ , ३६१ , ३७०, ३७० , ४०९ , ते ४११ , ४२६ ते ४२८.

# संदर्भग्रंथ


१. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र जलसिंचन आयोग अहवाल खंड - १ जून १९९९

पृ. क्र. ४८, ६५, ८९

२. महाराष्ट्राचे जिल्हे - सोलापूर प्रसिध्द विभाग, महाराष्ट्र सरकार मुंबई पृ. क्र. - १३

३. तत्रैव , पृ. क्र. १३ वे

४. तत्रैव , पृ. क्र. १४

५. Govt. of maharashtra , Gazatter of India , Maharashtra state

Solopur Dist - Bombay , Revised Edition - 1977

६. तत्रैव पृ. क्र. - १३ ते १४

७. तत्रैव पृ. क्र. - १५

८. तत्रैव पृ. क्र. १५

९. महाराष्ट्राचेजिल्हे, सोलापूर प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्र सरकार मुंबई, पृ. क्र. १४

१०. तत्रैव पृ. क्र. १५

११. बार्शी नगरपालिका शतकोत्तर, रौप्यमहोत्सव, स्मृतीग्रंथ - १९९०